# नांदेडात जुगार अड्ड्यावर धाड ;
# २८ जुगाऱ्यांना पकडले, २.५ लाखांचा ऐवज जप्त

## सहा. पोलीस अधीक्षक सी.एम. किरितिका यांची कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील कलामंदिर परिसरात मीलगेट रस्त्यावर एका मटका व ऑनलाईन लॉटरी सेंटरवर दि.८ जानेवारी रोजी धाड टाकून पोलिसांनी २८ जणांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून अडीच लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. शहर उपविभागीय अधिकारी सहा. पोलीस अधीक्षक किरतीका सी.एम. यांनी ही कारवाई केली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन कलामंदिर परिसरातील अॅक्सीस बँकेच्या पाठीमागे संतोष अहीर व गोकुळ अहीर यांच्या घरी बंदीस्त ठिकाणी मटका अड्डा व ऑनलाईन लॉटरी सेंटरवर शहर उपविभागीय अधिकारी सहा. पोलीस अधीक्षक किरतीका सी.एम. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश डाकेवाड,जमादार सुदाम जाकोरे, पोलीस नायक गजानन कदम, भगवान झंपलवाड, पोकॉं अंकुश लांडगे, गणेश श्रीरामे, महिला पोलीस अंमलदार अर्चना भोकरे, चालक पोकॉ लक्ष्मण डोपेवाड यांनी पंचासह संतोष अहीर व गोकुळ अहीर यांच्या बंदीस्त खोलीत अचानक धाड टाकली. या ठिकाणी जुगार खेळणारे व खेळविणारे एकुण २४ जुगारी मिळुन आले. चौघे पोलिसांना पाहून तेथून पसार झाले.

संतोष अहीर (४६,रा. कलामंदीर शिवशक्तीनगर नांदेड) हा जुगार अड्डा चालवित होता. या ठिकाणी विकास भवरे (३४, रा. शिवशक्तीनगर नांदेड ), सिताराम उफाडे, (४० रा. गायत्रीनगर निझामाबाद), बसवेश्वर होणराव (३३, रा. सखोजीनगर



नांदेड), साई अहीर (१६, रा. शिवशक्तीनगर नांदेड), रामदास शिंदे (५२, रा. आष्टी ता. हदगाव), साहेबराव कल्याणकर (७०, रा. शेंबोली ता. मुदखेड) , गोविंद खंदारे(४६, रा. विष्णुपुरी नांदेड) , हणमंत उपाडे (३५,रा. विनायकनगर निझामाबाद), चंद्रशेखर देसाई,५४, रा. आरमुर निझामाबाद, संजय क्षीरसागर **(पान २ वर..)**

## जुगार अड्डा चालकाकडे मिळाल्या ३ तलवारी व १ खंजर

कलामंदिर परिसरात दि. ८ जानेवारी रोजी जुगार अड्डयावर बंदीस्त खोलीत सहा. पोलीस अधीक्षक किरतीका सी.एम. यांनी धाड टाकली. जुगारींवर कारवाई करुन जुगाराचे साहित्यांसह रोकड जप्त केली. त्या ठिकाणची झडती घेतली असता अड्डयावर ५ हजार रुपये किंमतीच्या ३ तलवारी व १ खंजर मिळाला. पोलीस उपनिरीक्षक राजेश डकेवाड, जमादार सुदाम जाकोरे, पोलीस नायक गजानन कदम, भगवान झंपलवार, पोकॉं अंकुश लांडगे, गणे श्रीरामे, महिला पोलीस अंमलदार अर्चना भोकरे, चालक पोकॉं लक्ष्मण डोपेवाड यांनी जुगार अड्डा चालक संतोष अहीर व गोकुळ अहीर यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्याकडे प्राणघातक शस्त्रे मिळाली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात कलम ४/२५ कायद्यान्वये गुन्हादाखल करण्यात आला आहे.

पुण्यनगरी
दि. १०/०१/२०२४

(५६, रा. गणेशनगर नांदेड), संतोष जटाळे (४१,रा. बोधडी ता. किनवट), परसराम तेलंगे (४०, रा. कलंबर (बु) ता.कंधार), राज रेड्डी (५२, रा. करीमनगर हैद्राबाद), नामदेव जाधव (३१, रा. सोनखेड, चंद्रकांत धुताडे ( ३५, रा. वडगाव ता. जि. नांदेड), दादाराव शिंदे (७३ रा. विष्णुपुरी नांदेड), सोमेश बिडला, (३०,रा. रवीनगर कौठा नांदेड), गणेश यादव ( २६, रा. वजीराबाद चौक नांदेड), कृष्णा यादव (१७,रा. रविनगर कौठा नांदेड), राममुर्ती नायर ( ५५, रा. सोमेश कॉलनी नांदेड), दिपक जाधव ( ३५, ह.मु सोमेश कॉलनी नांदेड रा. देवसरी ता. उमरखेड), शेख सलीम शेख इमाम ( ३८, रा. लिंबगाव ता. जि. नांदेड), किरण धाबे (३३, रा. नेरली ता. जि. नांदेड), निलेश अहीर, तुलजेश यादव,राहुल भुसेवाड, कमलकिशोर यादव हे २८ जण जुगार खेळताना पोलिसांना मिळून आले. निलेश अहीर, तुलजेश यादव, राहुल भुसेवाड व कमलकिशोर यादव हे चौघेजण जुगार अड्डा चालवित होते. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी २४ आरोपीतांविरुध्द अटकेची कार्यवाही करण्यात आली असुन ईतर ४ आरोपी फरार आहेत. अटक आरोपीतांकडुन एकुण २ लाख ४९ हजार ४२८ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या कारवाईचे वरिष्ठाकडून कौतुक करण्यात आले.